**ROYAL COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE**

# SCHOLARSHIP NOTICE

17-07-2025

All the Junior and Degree students are hereby informed that they can apply for Maharashtra Government sponsored scholarships **online** to **www.mahadbtmahait.gov.in** website for the Academic Year i.e. 2025-2026.

**Eligibility :-**

- Applicant should be Domicile of Maharashtra
- Family annual income limit maximum upto Rs. 8.00 lakh. for **Rajarshi Chatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Scholarship**
- As per Government Resolution first two children are eligible for scheme.
- Applicant should not avail any other scholarship or stipend.

## Documents Required

- Domicile certificate issued by Authorized official.
- Annual income certificate issued by Authorized official which should be valid upto 31-03-2026.
- Family Declaration Certificate about two children's.
- Previous year Mark sheet.
- Aadhar Card
- Bank passbook
- Current year Fees receipt and Bonafide Certificate.

Maximum students can take benefit of Different Scholarships available on scholarship portal **www.mahadbtmahait.gov.in**.

**For online form filling they should log on to www.mahadbtmahait.gov.in**

JM0725

17/7/2025

17/7/25

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर,पनवेल,जि.रायगड -४१०२०६**

ई-मेल पत्ता:jtdire.१११५@gmail.com दुरध्वनी व फॅक्स नंबर (०२२)२७४५३८२०

क्र.विससं/उशि/कोविप/ शिष्यवृत्ती/महा-डिबीटी/२०२५-२६/ दि.

### परिपत्रक

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांची सन २०२५-२६ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भः** 1 महाआयटी कार्यालयाचा दि. २३/०६/२०२५ रोजीचा ईमेल.
2. क्र. उशिसं/शिष्-2025-26/डिबीटी/E-1990174 दि.07/07/2025

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. सन २०२५-२६ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून दि. ३०/०६/२०२५ पासून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.
महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

| अ.क्र | योजनांची नावे |
|---|---|
| १ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| २ | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 3 | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ४ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| ५ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |
| ६ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ७ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ८ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| ९ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| १० | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ११ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| १२ | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-२) |
| १३ | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| १४ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपीक प्राचार्य व विभागीय सहसंचालक कार्यालयांना अर्जाची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी महाडीबीटी पोर्टलवर मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत

**विद्यार्थ्यांसाठी सुचनाः-**

१) उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी http://mahadbtmahait.gov.in या लिंकवर महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२) शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी-शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

३) उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.

४) विद्यार्थी डी.बी.टी.पोर्टलद्वारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरु शकतात तथापि संबंधित विद्यार्थ्यांस त्यांनी निवडलेल्या Preference नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Preference काळजीपूर्वक नोंदविण्यात यावा.

५) विद्यार्थ्यांना अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदवितांना ते टक्केवारी (%) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृतीसाठी लाभार्थ्यांची निवड शिष्यवृत्तींच्या अटीनुसार (उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.

७) शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.

८) ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावा.

९) अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यास **महाविद्यालय/संस्थेने नोडल अधिकारी यांचेशी संपर्क साधून अचूक अर्ज भरावा. (महाविद्यालय/संस्थेने नियुक्त केलेल्या नोडल अधिकारी यांची यादी उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.)**

१०) विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.

**महाविद्यालयांसाठी सुचना :-**

१) विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने भरलेला शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या लिपिक लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध होतात.

२) शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी-शर्ती लाभ आदि बाबींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन महाविद्यालयातील लिपिकांनी विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करावी.

३) शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित / विनाअनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details) टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.) **महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve / Reject / Sent Back) करणे आवश्यक आहे.**

४) महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर (Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर उपलब्ध होतात.

५) **महाविद्यालयाच्या प्राचार्यानी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदरअर्जावर तातडीने (Approved / Reject / send Back) कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

६) **तसेच विद्यार्थ्यांच्या अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रासहीत जतन करुन ठेवण्यात यावी.**

७) **विदयार्थ्याचें अर्ज अनेक वेळा रिव्हर्ट (Revert) होऊ नयेत, त्याचे शिष्यवृत्तीचे अदायगीस विलंब होऊ नये यासाठी विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज अचूक भरण्यास महाविदयालय नोडल अधिका-याने मदत करावी ती त्याची जबाबदारी आहे.**

**विभागीय सहसंचालक कार्यालयांबाबत सुचना** :-

१. प्राचार्य लॉगीनमधून Approve झालेले उपरोक्त शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण (RO Login) मध्ये पडताळणीसाठी उपलब्ध होतात.

२. विभागीय सहसंचालक यांनी त्यांचे लॉगीनमध्ये शिष्यवृत्तीनिहाय पडताळणीसाठी उपलब्ध अर्जावर तातडीने कार्यवाही (Approved / Reject / send Back) करणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये भरलेली सर्व माहिती बरोबर असल्याची जोडलेल्या कागदपत्रावरुन छाननी करणे आवश्यक आहे.

४. शिष्यवृत्तींसाठी (शासन / विद्यापीठ) यांनी निश्चित केलेल्या शुल्काच्या प्रमाणानुसार लाभ देय आहेत. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी शिष्यवृत्ती अर्ज मंजूर (Approve) केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांस अर्जामध्ये दर्शविण्यात आलेल्या शुल्काप्रमाणे शिष्यवृत्ती लाभ देण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अर्जाची पडताळणी करतेवेळी विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये शुल्काबाबतची माहिती बरोबर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

५. शिष्यवृत्तीच्या अटी-शर्ती पूर्ण करणारे आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणारे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज संचालनालयाच्या (DHE Login) वर मंजूरीसाठी पाठविण्यात यावेत.

तसेच खाली दिलेले बदल महाआयटीने दि. २३/०६/२०२५ च्या ईमेल मध्ये कळविले आहे की, ज्यामध्ये नवीन शैक्षणिक वर्ष जूनपासून सुरू करण्याबाबत Maha IT ने Maha DBT पोर्टलवर एक बदल कळविले आहेत. ज्याद्वारे एकाच वेळी दोन शैक्षणिक वर्ष सुरू करता येतील. हा नवीन फिचर नवीन शैक्षणिक वर्षापासून (2025-26) लागू होणार असून, यामुळे अर्ज प्रक्रिया दोन्ही वर्षांसाठी (2024-25 आणि 2025-26) एकत्रितपणे राबवता येईल.

**या बदलांचे मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:**

**कोर्स एन्ट्री (Course Entry):**

- विद्यार्थ्यांनी त्यांचा सध्याचा कोर्स तसेच मागील वर्षातील कोर्सची माहिती भरणे आवश्यक आहे.
- ही प्रक्रिया सर्व अर्जदारांसाठी अनिवार्य (Mandatory) आहे.

**अनुक्रमणिक अर्ज प्रक्रिया (Sequential Application Flow):**

- विद्यार्थ्यांना सर्वप्रथम मागील शैक्षणिक वर्षासाठी (2024-25) अर्ज करणे आवश्यक आहे.
- त्यानंतरच ते चालू शैक्षणिक वर्षासाठी (2025-26) अर्ज करण्यास पात्र ठरतील.
- Reapply पर्याय 2023-24 आणि 2024-25 या दोन्ही वर्षासाठी उपलब्ध असेल.

**मागील मंजुरीवरील निर्बंध रदद (Removal of Previous Allotment Restriction):**

- यापूर्वी विद्यार्थ्यांना नवीन वर्षासाठी अर्ज करण्यापूर्वी मागील वर्षाच्या अर्जाला मंजुरी आवश्यक होती.
- आता विद्यार्थी मंजुरीची वाट न पाहता एकाच वेळी दोन्ही शैक्षणिक वर्षासाठी अर्ज करू शकतात.

**टीप:** हे बदल विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रियेत अधिक लवचिकता व सुलभता प्रदान करण्यासाठी महाआयटी मुंबई कडून करण्यात आले आहेत.

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी शिष्यवृत्ती योजनांबाबतची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांना त्यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेबाबत तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अर्ज करणेसाठी आवश्यक ती मदत करणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच विद्याथ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार कार्यालयांमार्फत महाविद्यालयात कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. झालेल्या कार्यशाळा, बैठक आयोजित केल्याबाबतचे इतिवृत्त वेळोवेळी संचालनालयास सादर करण्यात यावे.

**सोबत : सर्व योजनांची माहिती.**

Signed by Vijay Pandurang Narkhede
Date: 10-07-2025 14:26:07

विभागीय सहसंचालक
उच्च् शिक्षण, कोकण विभाग,पनवेल

**प्रत,**

प्राचार्य/संस्था प्रमुख
सर्व शासकीय , अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालये, विधी व अध्यापक महाविदयालये व अभिमत विदयापिठै,
जिल्हा – पालघर,ठाणे,रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग